# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२१ (प्रतिनीधी) :- अन्न् व आरोग्य ही दोन प्रमुख आव्हाने सद्यस्थितीत जगासमोर आहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी पर्यावरण टिकविणे व संवर्धन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व महाराष्ट्र शासन, सामाजिक वनीकरण विभाग, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. २१ मार्च रोजी जागतिक वन दिनानिमित्त प्रबोधनपर कार्यक्रम विद्यापीठात आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंचावर जळगाव येथील सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी संजय पाटील व विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. माहेश्वरी पुढे म्हणाले की, विकास व पर्यावरण हे एकमेकांना पुरक असावेत. मोठ्या प्रमाणावरील प्रदुषणामुळे आरोग्यमान खालावत चालले असून ग्लोबल वॉर्मिंग, अवकाळी पाऊस, हीम वर्षाव, तापमानात वाढ या गोष्टी दिसून येत आहेत. पर्यावरण संर्वधनासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असून केवळ झाडे लावून नाही तर ती जगविली देखील गेली पाहिजेत. विद्यापीठाच्या माळरानावर ३० वर्षापूर्वी तुरळक झाडे होती. विद्यापीठात सामुहिक प्रयत्नांमुळे आजमितीस अडीच ते तीन लाख इतकी झाडे लावण्यात आली व ती जगविण्यात आली असून पर्यावरणाचे संवर्धन करण्याबाबत विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विद्यापीठाचे ब्रीद वाक्य "टीच वन, इच वन ट्री वन" असे करुन पर्यावरण जागृतीचे प्रयत्न सुरु केले आहेत. संलग्नीत महाविद्यालयांना देखील झाडे लावणे व झाडे जगविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

विभागीय वन अधिकारी संजय पाटील यांनी सांगीतले की, पर्यावरणाची अधोगती होण्यास मानव जबाबदार आहे. पृथ्वीवर तेहतीस टक्के वन जमीन आवश्यक असून आजमितीस केवळ २० ते २१ टक्केच वनजमीन आहे. ती वाढविण्यावर भर देणे गरजेचे असून त्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाद्वारे प्रयत्न केले जात आहे. प्रास्ताविक करतांना प्रा. आशुतोष पाटील यांनी सांगितले की, भारतात प्रदुषण मुक्तीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न आवश्यक असून निसर्ग, वन, जंगल, पशु यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असावा. कार्यक्रमाची सुरूवात वृक्ष पूजनाने करण्यात आली. सुत्र संचालन सुभाष पवार यांनी केले. तर आभार वनपरिक्षेत्र अधिकारी प्रणाली धरमाळे यांनी मानले.

उद्घाटनानंतरच्या सत्रात जळगाव येथील मानद वन्यजीव रक्षक विवेक देसाई यांनी मानव व वन्यजीव संघर्ष या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या भाषणात मानव प्राणी व जंगलातील जीव सृष्टी यांच्या संदर्भात माहिती दिली. त्यानंतर वन व वन्यजीव अभ्यासक उमेश सोनार यांनी बांबू लागवड संदर्भात माहिती देऊन त्याच्या व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले. वन्यजीव अभ्यासक राहूल सोनवणे यांनी सातपुड्यातील जैव विविधता या संदर्भात माहिती देऊन विवेचन केले.

समारोप सत्र कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी डॉ. विनोद पाटील यांनी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने जागतिक वन दिन सारखे कार्यक्रम होणे आवश्यक असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभागातील जिल्ह्यामधील अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यापीठातील उद्यान विभागातील कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२१ (प्रतिनीधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळे अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागाद्वारे आधुनिक युगातील प्रगत शैक्षणिक प्रणालीसाठी आंतरविद्याशाखीय संदर्भावरील 'इंटरडिसप्लीनरी कान्टेक्स्ट फॉर एज्युकेशनल सिस्टीम इन मॉडर्न इरा' या राष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिसंवादाचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते आज दि. २१ मार्च रोजी करण्यात आले.

## जनसंपर्क विभाग

यावेळी मंचावर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, प्रा. पी.पी. माहुलीकर, डॉ. राजेश खंबायत, एनआयटीटीआर भोपाल, डॉ. लक्ष्मण शिंदे, देवी अहिल्या विश्व विद्यालय इंदौर, डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे व इंजि. राजेश पाटील उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे म्हणाले की, विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाने आजवर ६८ कार्यशाळांच्या माध्यमातून जवळपास १७ हजार विद्यार्थ्यांपर्यंत या नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती पोहचवली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० ची अंमलबजावणी करतांना निर्माण होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आजच्या कार्यशाळेत सहभागींची मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न या परिसंवादाच्या माध्यमातून व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, समाजाचे जिवंत राहणे ही स्वयं नूतनीकरणाची प्रक्रिया आहे, त्यामुळे मानवी विकासाच्या दृष्टीने विचार करता विकासाच्या प्रत्येक घटकानुसार ही प्रक्रिया राबविली गेली पाहिजे. या परिसंवादाच्या बीजभाषणात प्रा. पी. पी. माहुलीकर यांनी संपूर्ण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० चा आढावा मांडला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. प्रिती सोनी यांनी केले तर आभार डॉ. लीना चौधरी यांनी मांडले.

दुपारच्या सत्रात डॉ. राजेश खंबायत यांनी उच्च शिक्षणातील व्यावसायिकता आणि कौशल्य विकास या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी अध्ययन आणि अध्यापनातील आधुनिक नव प्रवाह आणि दृष्टीकोन या विषयावर मार्गदर्शन केले. या परिसंवादात१०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तर ३० विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.२१ (प्रतिनीधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमीच्या वतीने नाशिक विभागातील प्राध्यापकांसाठी भविष्यातील उच्च शिक्षणातील बदलांबाबत कार्यशाळा घेण्यात आली.

बुधवार दि.२० मार्च रोजी झालेल्या या कार्यशाळेत ४० प्राध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. उच्च शिक्षणात पुढील दहा वर्षात कोणत्या प्रकारचे बदल असावेत आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अपेक्षित बदल, या बदलांसाठी अकादमी कशा पध्दतीने काम करू शकेल याबाबत सविस्तर चर्चा झाली. नवी दिल्लीच्या नॉलेज लिंकचे निषिथकुमार व अजमल खान यांनी सर्वांशी चर्चा केली. प्र.कुलगुरू एस.टी.इंगळे, राज्य अध्यापक विकास अकादमीच्या महाव्यवस्थापक कल्याणी गोखले, कबीर पळशीकर उपस्थित होते. समन्वयक म्हणून डॉ.व्ही.एम.रोकडे यांनी काम पाहिले.

..............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २१ मार्च, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता